जमनालाल गोयंका डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, बाभुळगांव, जि. अकोला येथे सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित झालेल्या ४० विद्यार्थ्यांची राज्यातील इतर खासगी दंत महाविद्यालयांमध्ये बदली करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

गो.ते. रुग्णालय संकुल, ९वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१

शासन निर्णय क्रमांक पीजीडी १०१२/प्र.क्र.२५०/शिक्षण-२

दिनांक : १६ मे, २०१३

**प्रस्तावना**

भारत सरकारने सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून जमनालाल गोयंका डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, बाभुळगांव, जि. अकोला या महाविद्यालयाची मान्यता रद्द केली होती. तसेच तेथील बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांची राज्यातील अन्य दंत महाविद्यालयांमध्ये बदली करावी, अशी विनंती राज्य शासनास व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठास केली होती. या विनंतीप्रमाणे राज्य शासनाने दिनांक ०५/१०/२०१२ च्या शासन निर्णयान्वये उक्त महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची राज्यातील अन्य खासगी दंत महाविद्यालयांमध्ये बदली करण्याचे निदेश दिले होते. या निदेशानुसार कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, तथा "सक्षम प्राधिकारी" यांनी उक्त महाविद्यालयातील एकूण १२८ विद्यार्थ्यांची राज्यातील अन्य खासगी दंत महाविद्यालयांमध्ये बदली केली. ही बदली करताना उक्त महाविद्यालयात सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित झालेल्या या ४० विद्यार्थ्यांना विचारात

घेण्यात आले नव्हते, कारण त्यावर्षी उक्त महाविद्यालयास उक्त विद्यापीठाने संलग्नीकरण प्रदान केले नव्हते.

२. तथापि, <u>दि विदर्भ मेडिकल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फौंडेशन, अकोला विरुध्द भारतीय संघराज्य व इतर</u> (रिट याचिका क्रमांक ३९८२/२०११) आणि <u>आकाश संघपाल शेगांवकर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर</u> (रिट याचिका क्रमांक २५०२/२०१२) या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १९/१२/२०१२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये राज्य शासनास असे निदेश देण्यात आलेत, की उक्त ४० विद्यार्थ्यांची सुध्दा राज्यातील अन्य दंत महाविद्यालयामध्ये बदली करण्याकरिता दिनांक २८.०२.२०१३ वा तत्पूर्वी आवश्यक तो शासन निर्णय निर्गमीत करावा. पण सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी उक्त विद्यापीठाशी संलग्न असलेल्या राज्यातील एकूण २१ खासगी दंत महाविद्यालयांमध्ये फक्त सहा जागा शिल्लक असल्याने उक्त ४० विद्यार्थ्यांची बदली करावयाची झाल्यास राज्यातील काही दंत महाविद्यालयाची मंजूर प्रवेश क्षमता ओलांडली जाणार हे निश्चित होते. तरी उक्त ४० विद्यार्थ्यांची बदली करता यावी म्हणून राज्यातील काही खासगी दंत महाविद्यालयांची प्रवेश क्षमता ओलांडण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती शासनाच्या दिनांक ११/०२/२०१३ आणि दिनांक २७/०२/२०१३ च्या पत्रांन्वये भारतीय दंत परिषदेस करण्यात आली. पण अशा रीतीने मंजूर प्रवेश क्षमता ओलांडण्यास उक्त परिषद परवानगी देऊ शकत नाही, असे उक्त परिषदेने तिच्या दिनांक १८/०३/२०१३ च्या पत्रान्वये शासनास कळविले. त्यामुळे उक्त ४० विद्यार्थ्यांची बदली करता आली नाही.

३. दिनांक २८/०२/२०१३ पर्यंत आवश्यक तो शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला नाही म्हणून व्यथित होऊन श्री.आकाश संघपाल शेगांवकर व इतर सहा याचिकाकर्त्यांनी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अवमान याचिका (अवमान याचिका क्रमांक ८६/२०१३) दाखल केली. या प्रकरणी मा. उच्च

न्यायालयाने दिनांक ०९/०५/२०१३ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशात असे नमूद केले आहे की --

"The question of sanction or permission by the Dental Council of India can be considered subsequently also, if any such proposal submitted by the State Government is rejected by it."

४. मा. उच्च न्यायालयाचे उक्त निरीक्षण पाहता तसेच मा. उच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता पाहता आता शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

५. जमनालाल गोयंका डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, बाभुळगांव, जि. अकोला या महाविद्यालयात सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी प्रवेशित झालेल्या ४० विद्यार्थ्यांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न असलेल्या अन्य खासगी दंत महाविद्यालयांमध्ये, भारतीय दंत परिषदेच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधीन, बदली करण्यात यावी. उक्त बदली व तदनुषंगिक कामे पार पाडण्यासाठी कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांना सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

६. उक्त ४० विद्यार्थ्यांची बदली करण्यासाठी सक्षम प्राधिकारी खालील कार्यपध्दतीचे अनुसरण करतील.

## कार्यपध्दती

i. प्रथम, सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षी उक्त विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व खासगी दंत महाविद्यालयांची व या महाविद्यालयांमध्ये रिक्त असलेल्या जागांची यादी तयार करण्यात यावी.

ii. त्यानंतर उक्त ४० विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी. त्यासाठी उक्त विद्यार्थ्यांना सामाईक प्रवेश परीक्षेत प्राप्त

झालेले एकूण गुण आधार मानण्यात यावेत. तथापि, दोन विद्यार्थ्यांना समान गुण असल्यास ज्या विद्यार्थ्यास उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या तीन विषयांमध्ये प्राप्त एकूण गुण जास्त असतील, त्या विद्यार्थ्यास उक्त गुणवत्ता यादीत वरचा क्रमांक मिळेल.

iii. उक्त ४० विद्यार्थ्यांची बदली करण्यासाठी सक्षम प्राधिकारी समुपदेशनाची एक (वा, आवश्यकता असल्यास, अधिक) फेरी घेतील.

iv. विद्यार्थ्यांची गुणवत्ता आणि त्यांनी समुपदेशनाच्या वेळी दिलेले पसंतीक्रम विचारात घेऊन, खालील अटींच्या अधीन, त्यांच्या बदल्या करण्यात येतील.

**अटी**

I. कोणत्याही महाविद्यालयात त्या महाविद्यालयाच्या मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीत जास्त दोन जादा विद्यार्थ्यांना बदली देता येईल.

II. अशा रीतीने करण्यात आलेल्या बदल्यांमध्ये कोणत्याही परिस्थितीत फेरबदल करण्यात येणार नाहीत. त्यासंदर्भात राज्य शासनास किंवा उक्त विद्यापीठास प्राप्त झालेले सर्व विनंती अर्ज परस्पर दप्तर-दाखल करण्यात येतील.

III. उक्त बदल्या एका अपवादात्मक परिस्थितीत करण्यात येत आहेत. त्यामुळे हया बदल्यांना प्रवेश प्रक्रियेचे सर्वसाधारण नियम, जसे की आरक्षण, लागू राहणार नाहीत.

७. बदली झालेल्या विद्यार्थ्यांकडून संबंधित महाविद्यालय कोणतेही जादा शुल्क घेणार नाही. अन्यथा संबंधित महाविद्यालयावर/ व्यक्तीवर "दि महाराष्ट्र एज्युकेशनल

इन्स्टिटयुशन्स (प्रोहीबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७" अंतर्गत योग्य ती कारवाई करण्यात येईल.

८. ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बदलीपूर्वी भारत सरकारच्या व/ वा राज्य शासनाच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती/ शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अनुज्ञेय होता, त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बदलीनंतरही उक्त लाभ योग्य त्या फेरफारांसह अनुज्ञेय राहील.

९. उक्त बदल्या केल्यानंतर त्याबाबतचा अनुपालन अहवाल सक्षम प्राधिकारी शासनास सादर करतील आणि बदली झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी उक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

१०. उक्त बदल्या करण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांना शासनातर्फे कोणतेही मानधन देण्यात येणार नाही.

११. वरील बदल्यांना कार्योत्तर मान्यता द्यावी अशी विनंती भारतीय दंत परिषदेस करण्यात येईल.

१२. उक्त विद्यार्थ्यांना माहे मे-२०१३ मध्ये उक्त विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या बी.डी.एस. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षेस बसता यावे म्हणून सक्षम प्राधिकारी योग्य ती कार्यवाही करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कृ.भि. केंगा

( कृ.भि. केंगा )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यभवन मलबार हिल, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती/ शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलिटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव
आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (स्पीड पोस्टाने)
आयुक्त, अदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक (स्पीड पोस्टाने)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अकोला (स्पीड पोस्टाने)
कक्ष अधिकारी (शिक्षण-१), वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मुंबई
अधिष्ठाता, जमनालाल गोयंका डेंटल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल, बाभुळगांव, जि. अकोला
निवडनस्ती (शिक्षण-२)